MHYA150007022021

## नियमित दिवाणी दावा क्र.३०/२०२१ मधील निशाणी क्र.२६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश १ नियम १० (२) अन्वये दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जात नमुद केले की, वादी यांनी वाद मालमत्ता वेगळी विभागुन सरसनिरस वाटणी करनु प्रत्यक्ष ताबा मिळण्याकरीता व भविष्यकालीन नुकसान भरपाईची चौकशी करुन मिळणेबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यातील वाद मालमत्ता मुळ मालक मयत चंद्रभान लक्ष्मण गुल्हाणे यांची असुन त्यांचे वारस वादी व प्रतिवादी हे आहेत. न्यायनिवाडा पुर्ण प्रभावी व सर्व वारसावर बाधक होण्यासाठी त्यांना पक्षकार म्हणुन घेणे आवश्यक आहे. वादी यांना महादेव चंद्रभान गुल्हाणे, रमाबाई मधुकर गुल्हाणे, निर्मलाबाई सुभाष जिरापुरे, प्रभाकर दशरथ गुल्हाणे, जोती दिलीप गुल्हाणे, सुनिता संजय राजगुरे यांना प्रतिवादी महणुन समाविष्ट करण्याची पवारणगी देण्यात यावी अशी विनंती वादी यांनी केली.

३. प्रतिवादींनी अर्जावर त्यांचे म्हणणे सादर करुन नमुद केले की, प्रस्तुतचा अर्ज हा विलंब करण्यासाठी दाखल केला आहे. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली.

४. येथे सर्वप्रथम नमुद करण्यात येते की, रमाबाई, निर्मला व

जिजाबाई ह्या वादी यांच्या बहिनी आहेत व प्रभाकर व महादेव भाऊ आहेत व सुनिता व जोती ह्या प्रतिवादी दिपक व नंदकिशोर यांच्या बहिनी आहेत असे वादी यांचे कथन आहे.

५. अभिलेखावरील दस्तऐवजाची पाहणी केली असता दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा वाटपासाठी, ताबा मिळण्यासाठी व नुकसान भरपाईच्या मागणीसाठी दाखल केला आहे. ज्यांना दाव्यात पक्षकार म्हणुन समाविष्ठ करण्याचे आहे ते वादी व प्रतिवादी यांचे जवळचे व नात्याने भाऊ बहिन असल्याचे दिसुन येते.

६. अभिलेखावरील दस्तऐवज, दाव्याचे स्वरुप व दाव्यातील मागणी पाहता प्रस्तुत दाव्यात वर नमुद पक्षकार प्रस्तुत प्रकरणातील न्यायनिवाड्यासाठी आवश्यक असल्याचे, तसेच सदरची दाव्यात वर नमुद व्यक्तिंना प्रतिवादी क्र. ३ ते ८ म्हणुन समाविष्ठ केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याचे स्वरुप बदलणार नसल्याचे दिसुन येते. वरील सर्व बाबींचा एकत्रितरित्या विचार करता मी या निष्कर्षाला आलो आहे की, वादी यांचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. महादेव चंद्रभान गुल्हाणे, रमाबाई मधुकर गुल्हाणे, निर्मलाबाई सुभाष जिरापुरे, प्रभाकर दशरथ गुल्हाणे, जोती दिलीप गुल्हाणे, सुनिता संजय राजगुरे यांना प्रतिवादी क्र.३ ते ८ म्हणुन समाविष्ट करण्यात यावे.

 **नियमित दिवाणी दावा क्र.३०/२०२१.**

**मोतीराम वि. दिपक व इतर.**

३. वादी यांनी दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्तीची प्रत पुढील तारखेपर्यंत सादर करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2026.03.12 17:43:01 +0530

नेर. (जी. सी. फुलझळके)

दिनांक – १२.०३.२०२६ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, नेर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Ku. B. N. Nare (Grade-III) |
| Court | :- | Civil Judge Jr. Dn., Ner. |
| Date | :- | 12.03.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 12.03.2026 |
| Order uploaded on | :- | 12.03.2026 |